# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.११/१०/२०१८
## दि.१०/१०/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ५०६/१८,भादविक ४५४,३८० |
| **फिर्यादी** | राहुल बंडगर,वय-२८,रा.धायरी गांव,पुणे |
| **आरोपी** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१०/२०१८ रोजी ०९/३० ते १७/४५ वा.चे दरम्यान फ्लॅट नं.९,पहिला मजला जिज्ञासा कॉम्पलेक्स धायरी-गाव,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहायाने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील रोख ५० हजार रूपये व सोन्याचे दागिने असा एकुण १,८५,०००/- रू किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ननावरे ९५९४९६९३९९ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | बंडगार्डन पो स्टे २९८/१८,भादविक २७९,३०४(अ),मोव्हेॲक्ट १८४,२/१७७,११९/१७७ |
| **फिर्यादी** | व्हि.एल.घोरपडे, सहा.पो.फौज. बंडगार्डन पो स्टे पुणे शहर |
| **आरोपी** | हेमंत सुधाकर निगडे, रा.भेंडे चौक,आंबेगांव-बुद्रुक,पुणे (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/१०/२०१८ रोजी १०/०० ते १०/३० वा. चे दरम्यान म्हाडा कॉलनी आगरकर नगर रोड अलंकार टॉकीज जवळ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील दुचाकी ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून, हयगयीने,अविचाराने व भरधाव वेगात चुकीचे दिशने चालवुन,नमुद ठिकाणी पादचारी इसम भिषण सिंग रियल,रा.सनं.१६३/२१/८,आदर्श कॉलनी,टिंगरेनगर,पुणे यांस जबर ठोस मारून, गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत होवुन,अपघाताचे ठिकाणी न थांबता,अपघाताची खबर न देता पळुन गेला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. ए.आय.पठाण ८४५९९९७८६३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ३९९/१८,भादविक २७९,३०४(अ),३३७,४२७,मोव्हेॲक्ट ११९/१७७ |
| **फिर्यादी** | बाळु दत्तु गायकवाड,वय-४८वर्षे,रा.भेकराईनगर,फुरसुंगी,पुणे |
| **आरोपी** | स्वप्नील रामभाऊ तोडासे,वय-३३ वर्षे,रा.तावरे बिल्डींग,ता.बारामती,जि.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१०/२०१८ रोजी ११/४५ वा. मम्मादेवी चौक ते सोलापुर बाजार पोलीस चाकीचे मधील रोडवर पीएमटी बस स्टॉप जवळ पुलगेट,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांची पत्नी सौ.लतिका बाळु गायकवाड,वय-४० वर्षे,हीस मोटार सायकलवर पाठीमागे बसवुन स्वारगेट येथे जात असताना,यातील नमुद इसमाने त्याचे ताब्यातील एस.टी. बस ही वाहतुकीचे नियमांकडे दुर्लक्ष करून,हयगयीने व अविचाराने डावे बाजुस वळविल्याने,सदर एस.टी.बसचा मध्यभाग फिर्यादी यांचे दुचाकीचे हॅन्डलला लागल्याने त्यांचा तोल जावुन,त्यांचे पाठीमागे बसलेली सौ.लतिका बाळु गायकवाड हिचे डोक्यास जबर मार लागुन,त्यामध्ये ती गंभीर जखमी होऊन तीचे मृत्युस कारणीभुत झाला. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. डी.व्ही.गुर्जर ९६५७०६८८१० |

४

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे ६३४/१८,भादविक ३०४(अ),३४ |
| **फिर्यादी** | कैलास आखुटे, पो.हवा. कोंढवा पो.स्टे पुणे शहर |

| | |
|---|---|
| **आरोपी** | दोन इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/१०/२०१८ रोजी सकाळी ०७/३० वा. सनं.५,गल्ली नं.३,काकडे वस्ती,कोंढवा-बुद्रुक येथील झायेद कन्स्ट्रक्शन इमारतीचे तळमजल्यावर लिफ्टच्या मोकळया डक्ट मध्ये काकडे वस्ती,कोंढवा,पुणे |
| **तपशिल** | यातील नमुद इसम हे झायेद कन्स्ट्रकशन इमारतीचे बिल्डर असुन,त्यांचे पुणे येथील नमुद ठिकाणी असलेल्या बिल्डींग मधील इसमांचे जिवीताचे व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातुन इमारती मधील जीना व लिफ्टचे उघडया डक्टवर योग्य ते साधन ठेवण्याची सोय न करता, हलगर्जीपणा व निष्काळजीपणा केल्यामुळे,महीला विमला गणेश पात्रे,वय-२६ वर्षे, सनं.५, गल्ली नं.३,काकडे वस्ती,कोंढवा-बुद्रुक,पुणे हया पहिल्या मजल्यावरील शौचालयावरून परत दुस-या मजल्यावरील त्यांचे राहते फ्लॅट मध्ये जाण्यासाठी जीन्यातुन खाली येत असताना, सदर इमारतीचे लिफ्टचे मोकळया डक्ट मधुन त्या खाली तळमजल्यावर पडुन,त्यामध्ये गंभीर जखमी होवुन मयत झाल्या आहेत. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. मोरे ९८७०३२७७०० |

**५**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | अलंकार पो स्टे ४०२/१८,भादविक ३५३,३३२,३४१,२७९,३४,मोटार वाहन का.३(१)१८१, १२८(१)/१७७,१२९/१७७ |
| **फिर्यादी** | पो.हवा. चिंतामणी देसाई, कोथरुड वाहतुक विभाग,पुणे शहर |
| **आरोपी** | दोन मोटार सायकलवरील चार अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१०/१०/२०१८ रोजी १३/४५ वा. दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल समोरील बाजुस,एरंडवणा, पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे सहकारी पो.कॉ.पाटील यांचेसोबत मिळुन दिनानाथ मंगेशकर हॉस्पीटलचे समोरील बाजुस नो-पार्कीगच्या कारवाई करीत असताना, यातील नमुद इसमांनी मोटार सायकलवरुन ट्रिपलसीट बेदरकारपणे विनाहेल्मेट गाडी चालवित घेवुन येत असताना फिर्यादी हे त्यांचे वाहनांवर कारवाई करीत असताना,सदर इसमांनी फिर्यादी हे करीत असलेल्या शासकीय कामात अडथळा निर्माण करून,त्यांना अरेरावीची भाषा करीत त्यांना अपशब्द वापरून, धक्का-बुक्की केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. एस.जी.चव्हाण ९४२२६१५५५७५ |

**६**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ४०२/१८,भादविक ३८४,३८५,३४ |
| **फिर्यादी** | एक पुरूष,वय-३६ वर्षे,रा.हडपसर,पुणे |
| **आरोपी** | १.माजीद उर्फ वसीम आमिन शेख,वय-३३ वर्षे,रा.४५ घोरपडी पेठ पुणे २.शोएब सुलतान मुजाहीद,वय-३५ वर्षे,रा.२७५,गुरुवार पेठ,पुणे ३.परवेज इक्बाल पटवेकर,वय-२८ वर्षे,रा.२८० गुरुवार पेठ,पुणे ४.फारुख युसुफ खान,वय-२४ वर्षे,रा.३३८ घोरपडी पेठ,पुणे ५.फैसल अन्वर शेख,वय-२३ वर्षे,रा.भाग्योदयनगर,कोंढवा,पुणे (अटक) व इतर दोन |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१७/०८/२०१८ रोजी १८/१६ वा. ते दि.१०/१०/२०१८ रोजी १८/०० वा.पर्यंत वेळोवेळी सर्वे नंबर ७३/१५९,गल्ली नं.६,ए-गुलाम अलीनगर हांडेवाडी रोड,हडपसर,पुणे ते कणक हॉटेल धोबी घाट जवळ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वडीलोपार्जीत घराचे दुरुस्तीचे बांधकाम चालु असताना,त्या दरम्यान एक कामगार इसम खाली पडुन मृत्यु झाल्याच्या कारणावरुन,सदरची बातमी न छापण्या करीता,फिर्यादी यांचे बांधकाम सुरुळीत चालु करून देण्याकरीता,तसेच महानगरपालीका येथे कारवाई करण्याकरीता दिलेला अर्ज मागे घेण्याकरीता एकुण ५,००,०००/- रुपये रक्कम खंडणी स्वरूपात मागुन,त्याअंती १,८०,०००/- रुपये ठरवुन ५०,०००/- रुपये खंडणी म्हणुन रोख रक्कम घेतली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. ए.ए.शेटे ९१५८८११६६६ |

७

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | कोंढवा पो स्टे /१८,भादविक ३२४,३२३,५०४,३४,१४३,१४४,१४७,१४८,१४९ |
| **फिर्यादी** | अभिनव जाधव,वय-२९,रा.पिसोळी रोड,कोंढवा,पुणे |
| **आरोपी** | एकुण पाच इसम,सर्व रा.येवलेवाडी,कोंढवा,पुणे |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०९/१०/२०१८ रोजी दु.१२/३० वा.चे सुमारास सिंहगड येवलेवाडी,ता.हवेली,जि.पुणे येथील इंजिनिअरिंग कॉलेजचे लायब्ररी मध्ये |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे क्लास मधील सहकारी यांचेसह इंजिनिअरिंग कॉलेजचे लायब्ररी मध्ये प्रोजेक्ट वर्क करीत असताना,यातील नमुद इसमांनी संगनमत करून,गैरकायदयाची मंडळी जमवुन,जुन्या वादाचा राग धरून,फिर्यादी यांना शिवीगाळ व लाथा-बुक्क्यांनी तसेच लोखंडी रॉडने मारून जखमी केले. |
| **त.अंमलदार** | सहा.पो.निरी. मोरे ९८७०३२७७०० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**